S.N.D. POLYTECHNIC,BABHAULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing… **Date: 07/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## भौतिकशास्त्रज्ञ गोपालसमुद्रम रामचंद्रन

गोपालसमुद्रम नारायणन रामचंद्रन ऊर्फ जीएन रामचंद्रन हे एक भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. कोलेजनच्या संरचनेसाठी ट्रिपल-हेलिकल मॉडेल प्रस्तावित करणारे ते पहिले शास्त्रज्ञ होते. त्यानंतर त्यांनी जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्रात महत्वपूर्ण योगदान दिले. रामचंद्रन यांचा जन्म ८ ऑक्टोबर १९२२ रोजी भारतातील कोचीन राज्यातील एर्नाकुलम शहरात एका तमिळ कुटुंबात झाला. त्यांनी १९३९ मध्ये तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमधून भौतिकशास्त्रात बीएस्सी पदवी मिळवली. १९४२ मध्ये त्यांनी बंगळुरू येथून सादर केलेल्या प्रबंधासह मद्रास विद्यापीठातून भौतिकशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९४७ मध्ये त्यांनी डी.एस्सी. पदवी प्राप्त केली. त्यांच्या अभ्यासादरम्यान त्यांनी एक्स-रे मायक्रोस्कोपसाठी एक्स-रे फोकसिंग मिरर तयार केला.

पीएचडी पूर्ण केल्यानंतर ते १९४९ मध्ये बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत भौतिकशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून परतले. १९५२ मध्ये ते मद्रास विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि प्रमुख म्हणून गेले. तिथे त्यांनी क्रिस्टल भौतिकशास्त्रावर काम सुरू ठेवले. एक्स-रे डिफ्रॅक्शनचा वापर करून रामचंद्रन यांनी गोपीनाथ कार्था यांच्यासोबत १९५४ मध्ये नेचर जर्नलमध्ये कोलेजनची तिहेरी पेचदार रचना प्रकाशित केली, ज्यामुळे 'मद्रास गट'कडे जगभरातील वैज्ञानिकांचे लक्ष वेधले गेले. रामचंद्रन यांना मिळालेल्या उल्लेखनीय पुरस्कारांमध्ये भारतातील भौतिकशास्त्रासाठी शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (१९६१) आणि लंडनच्या रॉयल सोसायटीची फेलोशिप यांचा समावेश आहे. १९९९ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिस्टलोग्राफी संघाने त्यांना 'क्रस्टलोग्राफीमधील उल्लेखनीय योगदानासाठी' इवाल्ड पुरस्काराने सन्मानित केले. प्रथिनांची रचना आणि कार्य यांच्यावरील मूलभूत संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कारासाठीही नामांकन मिळाले. रामचंद्रन यांचे ७ एप्रिल २००१ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 07, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING